भारत सरकार

**विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# परकीय चलन वाचवणे व चोरट्या व्यापाराच्या हालचालींना प्रतिबंध करणे अधिनियम, १९७४

**(सन १९७४ चा अधिनियम क्रमांक ५२)**

[ रोजी अंमलात असल्याप्रमाणे ]

# The Conservation of foreign Exchange and Prevention of Smuggling Activities, Act, 1974

**(Act No. 52 of 1974)**

[ *As in force on the* ]

✻

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

**२०१७**

[ **किंमत :** रुपये .०० ]

# विशोधन अधिनियमांची सूची

१. ‘ परकीय चलन वाचवणे व चोरट्या व्यापाराच्या हालचालींना प्रतिबंध करणे अधिनियम, १९७५ ’ (विशोधन) (१९७५ चा ३५).

२. ‘ परकीय चलन वाचवणे व चोरट्या व्यापाराच्या हालचालींना प्रतिबंध करणे अधिनियम, १९७६ ’ (विशोधन) (१९७६ चा २६).

३. ‘ परकीय चलन वाचवणे व चोरट्या व्यापाराच्या हालचालींना प्रतिबंध करणे अधिनियम, १९७६ ’ (विशोधन) (१९७६ चा ९०).

# परकीय चलन वाचवणे व चोरट्या व्यापाराच्या हालचालींना प्रतिबंध करणे अधिनियम, १९७४

**कलमांचा क्रम**


१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. विवक्षित व्यक्तींना स्थानबद्ध करणारे आदेश करण्याचा अधिकार.

४. स्थानबद्धता आदेशांची अंमलबजावणी.

५. स्थानबद्धतेचे ठिकाण व शर्ती विनियमित करण्याचा अधिकार.

५क. स्थानबद्धतेची कारणे पृथक करता येतील.

६. स्थानबद्धता आदेश हे विवक्षित कारणांवरून विधिअग्राह्य किंवा अप्रवर्ती असणे.

७. फरारी व्यक्तींच्या संबंधातील अधिकार.

८. सल्लागार मंडळे.

९. मंडळाचे मत न घेता व्यक्तींना कोणत्या प्रकरणी व कोणत्या परिस्थितीत तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ स्थानबद्ध ठेवता येईल.

१०. स्थानबद्धतेचा जास्तीत जास्त कालावधी.

१०क. स्थानबद्धतेचा कालावधी वाढवणे.

११. स्थानबद्धता आदेश परत घेणे.

१२. स्थानबद्ध व्यक्तींची तात्पुरती सुटका.

१२क. आणीबाणीला तोंड देण्यासाठी विशेष उपबंध.

१३. सद्‌भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीचे संरक्षण.

१४. निरसन.

# परकीय चलन वाचवणे व चोरट्या व्यापाराच्या हालचालींना प्रतिबंध करणे अधिनियम, १९७४

[ ]

परकीय चलन वाचवणे व त्यांचे आवर्धन करणे आणि चोरट्या व्यापाराच्या हालचालींना प्रतिबंध करणे या प्रयोजनांसाठी विवक्षित प्रकरणी प्रतिबंधक स्थानबद्धतेसाठी आणि व त्याच्याशी संबंधित बाबींसाठी उपबंध करण्याकरिता अधिनियम.

ज्याअर्थी, परकीय चलनविषयक विनियमांचा भंग व चोरट्या व्यापाराच्या हालचाली यांचा राष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर अधिकाधिक हानिकारक परिणाम होत असून त्यामुळे राज्याच्या सुरक्षेवर गंभीर प्रतिकूल परिणाम होत आहे ;

आणि ज्याअर्थी, अशा हालचाली किंवा भंग ज्या व्यक्ती ज्या रीतीने आयोजित करतात व चालू ठेवतात ते विचारात घेता आणि तस्करीच्या व्यवहाराच्या अत्यंत अनुकूल असलेल्या विवक्षित क्षेत्रांमध्ये चोरट्या व्यापाराच्या हालचाली बऱ्याच मोठ्या प्रमाणात गुप्तपणे आयोजित करण्यात व चालू ठेवण्यात येतात ही गोष्ट विचारात घेता, अशा हालचालींना व भंगांस परिणामकारक प्रतिबंध करण्यासाठी, त्यांच्याशी कोणत्याही रीतीने संबंधित असलेल्या व्यक्तींच्या स्थानबद्धतेसाठी उपबंध करणे आवश्यक आहे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंचविसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

संक्षिप्त नाव विस्तार व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, ‘ परकीय चलन वाचवणे व चोरट्या व्यापाराच्या हालचालींना प्रतिबंध करणे अधिनियम, १९७४ ’ असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) तो, केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा, (२० डिसेंबर, १९७४ पेक्षा नंतरचा नसेल अशा दिनांकी अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमामध्ये संदर्भावरून अन्यथा आवश्यक नसेल, तर,—

(क्) “ समुचित शासन ” याचा अर्थ, केंद्र शासनाने किंवा केंद्र शासनाच्या अधिकाऱ्याने केलेल्या आदेशाच्या किंवा असा आदेशाखाली स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीच्या संबंधात केंद्र शासन असा आहे व राज्य शासनाने किंवा राज्य शासनाच्या अधिकाऱ्याने केलेल्या आदेशाच्या किंवा अशा आदेशाखाली स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीच्या संबंधात राज्य शासन, असा आहे ;

(ख्) “ स्थानबद्धता आदेश ” याचा अर्थ, कलम ३ खाली केलेला आदेश असा आहे ;

(ग्) “ विदेशी व्यक्ती ” याला ‘ विदेशी व्यक्ती अधिनियम, १९४६ ’ (१९४६ चा ३१) यामध्ये त्याला असलेला अर्थच आहे ;

(घ्) “ भारतीय सीमाशुल्क जलधी ” याला ‘ सीमाशुल्क अधिनियम, १९६२ ’ (१९६२ चा ५२) याच्या कलम २-खंड (२८) मध्ये त्याला असलेला अर्थच असेल ;

(ङ्) “ चोरटा व्यापार ” याला ‘ सीमाशुल्क अधिनियम, १९६२ ’ (१९६२ चा ५२) याच्या कलम २ खंड (३९) मध्ये त्याला असलेला अर्थच आहे आणि त्यानुसार त्याचे सर्व व्याकरणीक रुपभेद व सजातीय शब्दप्रयोग यांचा अर्थ लावण्यात येईल ;

(च्) संघ राज्यक्षेत्राच्या संबंधात “ राज्य शासन ” याचा अर्थ, त्याचा प्रशासक असा आहे ;

(छ्) जम्मू व काश्मीर राज्यामध्ये अंमलात नसलेल्या कायद्याच्या, या अधिनियमामध्ये केलेल्या कोणत्याही संदर्भाचा अर्थ, त्या राज्यामध्ये कोणताही समनुरुप कायदा अंमलात असल्यास त्याचा संदर्भ असा लावण्यात येईल.

विवक्षित व्यक्तींना स्थानबद्ध करणारे आदेश करण्याचा अधिकार.

**३.** (१) केंद्र शासन किंवा राज्य शासन किंवा केंद्र शासनाने या कलमाच्या प्रयोजनार्थ विशेष अधिकार प्रदान केलेला, त्या शासनाच्या सह सचिवापेक्षा कमी दर्जाचा नसलेला, त्या शासनाचा कोणताही अधिकारी, किंवा राज्य शासनाने या कलमाच्या प्रयोजनार्थ विशेष अधिकार प्रदान केलेला, त्या शासनाच्या सचिवापेक्षा कमी दर्जाचा नसलेला त्या शासनाचा कोणताही अधिकारी याला (विदेशी व्यक्तीसुद्धा) कोणत्याही व्यक्तीच्या संबंधात, परकीय चलन वाचवण्यास किंवा त्याचे आवर्धन करण्यास कोणत्याही प्रकारे बाधक होईल अशी कृती करण्यास तिला प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने किंवा,—

(एक) मालाचा चोरटा व्यापार करण्यास ; किंवा

(दोन) मालाचा चोरटा व्यापार करण्यास अपप्रेरण देण्यास ; किंवा

(तीन) चोरट्या मालाची वाहतूक करण्यात तो लपवण्यात किंवा बाळगण्यात गुंतलेली राहण्यास ; किंवा

(चार) चोरट्या मालाची वाहतूक करणे, तो लपवणे किंवा बाळगणे यामध्ये गुंतलेली राहण्याव्यतिरिक्त अन्य प्रकारे चोरट्या मालाचा व्यवहार करण्यास ; किंवा

(पाच) मालाच्या चोरट्या व्यापारात किंवा मालाच्या चोरट्या व्यापारास अपप्रेरण देण्यात गुंतलेल्या व्यक्तींना आसरा देणारा तिला प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने अशा व्यक्तीला स्थानबद्ध करण्यात यावे असा निर्देश देणारा आदेश करणे आवश्यक आहे अशी त्याची खात्री झाल्यास तसे करता येईल.

(२) राज्य शासन किंवा राज्य शासनाने अधिकार प्रदान केलेला अधिकारी स्थानबद्धतेचा कोणताही आदेश करील तेव्हा राज्य शासन दहा दिवसांच्या आत आदेशाच्या संबंधातील अहवाल केंद्र शासनाकडे पाठवील.

(३) संविधानाचा अनुच्छेद २२-खंड (५) च्या प्रयोजनार्थ, स्थानबद्धता आदेशास अनुसरून स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीला, ज्या कारणांसाठी आदेश करण्यात आलेला आहे ती कारणे स्थानबद्धतेनंतर शक्य होईल तितक्या लवकर परंतु स्थानबद्धतेच्या दिनांकापासून सामान्यपणे पाच दिवसांपेक्षा उशीरा नसेल अशा वेळी व अपवादात्मक परिस्थितीत आणि लेखी नमूद करून ठेवावयाच्या कारणांसाठी पंधरा दिवसांपेक्षा उशीरा नसेल अशा वेळी कळविण्यात येईल.

स्थानबद्धता आदेशांची अंमलबजावणी.

**४.** ‘ फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ ’ (१९७४ चा २) याखाली अटक वॉरंटांच्या अंमलबजावणीसाठी उपबंधित केलेल्या रीतीने भारतातील कोणत्याही ठिकाणी स्थानबद्धता आदेशाची अंमलबजावणी करता येईल.

स्थानबद्धतेचे ठिकाण व शर्ती विनियमित करण्याचा अधिकार.

**५.** जिच्या संबंधात स्थानबद्धता आदेश करण्यात आलेला आहे अशी प्रत्येक व्यक्ती,—

(क्) समुचित शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा ठिकाणी व अशा शर्तीखाली, निर्वाह इतरांबरोबर भेटी किंवा दळणवळण, शिस्त व शिस्तभंगाबद्दल शिक्षा यासंबंधीच्या शर्तींसह स्थानबद्ध केली जाण्यास ; आणि

(ख्) समुचित शासनाच्या आदेशावरून, स्थानबद्धतेच्या एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मग ते त्याच राज्यातील असो वा दुसऱ्या राज्यातील असो हलवला जाण्यास पात्र असेल :

परंतु, राज्य शासन एखाद्या व्यक्तीला एका राज्यातून दूसऱ्या राज्यात हलविण्यासाठी त्या दुसऱ्या राज्याच्या शासनाच्या संमतीवाचून खंड (ख्) खाली कोणताही आदेश करणार नाही.

स्थानबद्धतेची कारणे पृथक करता येतील.

६. [१][५क. दोन किंवा अधिक कारणांवरून करण्यात आलेला असेल अशा, कलम ३-पोटकलम (१) खालील स्थानबद्धता आदेशाला अनुसरून एखाद्या व्यक्तीस स्थानबद्ध केलेले असेल त्या बाबतीत, असा स्थानबद्धता आदेश अशा प्रत्येक कारणावरून स्वतंत्रपणे करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल आणि त्याप्रमाणे,—

(क्) केवळ, त्यापैकी एखादे कारण किंवा काही कारणे,—

(एक) मोघम,

---

१. १९७५ चा अधिनिय ३५ कलम २ द्वारे घातले.

(दोन) अस्तित्वहीन

(तीन) अप्रस्तुत,

(चार) अशा व्यक्तीशी संबंध नसलेली किंवा निकट संबंध नसलेली अशी, किंवा

(पाच) इतर कोणत्याही कारणामुळे विधिअग्राह्य आहे/आहेत म्हणून असा आदेश विधिअग्राह्य किंवा अप्रवर्ती असल्याचे मानण्यात येणार नाही आणि म्हणून, कलम ३ च्या पोटकलम (१) मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे, असा आदेश करणाऱ्या शासनाची किंवा अधिकाऱ्याची उर्वरित कारणाच्या किंवा कारणांच्या संबंधात खात्री होऊन त्याने स्थानबद्धतेचा आदेश केला असता असे समजणे शक्य होत नाही ;

(ख्) आदेश करणाऱ्या शासनाने किंवा अधिकाऱ्याने पोटकलम (१) मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे उर्वरित कारणाच्या किंवा कारणांच्या संबंधात खात्री करून घेतल्यानंतर उक्त पोटकलमाखाली स्थानबद्धता आदेश केलेला असल्याचे मानण्यात येईल.]

स्थानबद्धता आदेश हे विवक्षित कारणांवरून विधिअग्राह्य किंवा अप्रवर्ती नसणे.

**६.** कोणताही स्थानबद्धता आदेश हा केवळ,—

(क्) त्याखाली स्थानबद्ध करावयाची व्यक्ती स्थानबद्धता आदेश करणाऱ्या शासनाच्या किंवा अधिकाऱ्याच्या प्रादेशिक अधिकारितेच्या सीमांच्या बाहेर असल्याच्या ; किंवा

(ख्) अशा व्यक्तीच्या स्थानबद्धतेचे ठिकाण उक्त सीमांच्या बाहेर असल्याच्या, कारणावरून विधिअग्राह्य किंवा अप्रवर्ती असणार नाही.

फरारी व्यक्तीच्या संबंधातील अधिकार.

**७.** (१) तिच्या संबंधात स्थानबद्धता आदेश करण्यात आलेला आहे ती व्यक्ती फरारी झालेली आहे किंवा आदेशाची अंमलबजावणी होऊ नये म्हणून ती लपून राहिलेली आहे असे मानण्यास समुचित शासनास कारण असेल तर, शासन,—

(क्) त्या गोष्टीचा लेखी अहवाल उक्त व्यक्ती सर्वसाधारणपणे जेथे रहिवास करते त्या ठिकाणी अधिकारिता महानगर दंडाधिकाऱ्याकडे किंवा प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याकडे देईल ; आणि त्यानंतर, ‘ फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ ’ (१९७४ चा २) याचे उपबंध हे, उक्त व्यक्तीस स्थानबद्ध करण्यात यावे असा निदेश देणारा आदेश म्हणजे जणू काही दंडाधिकाऱ्याने काढलेले वॉरंट असावे त्याप्रमाणे त्या व्यक्तीच्या व तिच्या संपत्तिच्या संबंधात लागू होतील ;

(ख्) **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केलेल्या आदेशाद्वारे, उक्त व्यक्तीने आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्यांसमोर, अशा ठिकाणी व अशा कालावधीच्या आत हजर रहावे असा निदेश देऊ शकेल ; आणि उक्त व्यक्तीने अशा निदेशाचे अनुपालन करण्यात कसूर केली तर, ती व्यक्ती एका वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल, मात्र, निदेशाचे अनुपालन करणे तिला शक्य नव्हते व ज्या कारणामुळे आदेशाचे अनुपालन अशक्य झाले ते कारण आणि तिचा ठावठिकाणा तिने आदेशात नमूद केलेल्या व्यक्तीला कळवला होता असे तिने सिद्ध केले तर गोष्ट अलाहिदा.

(२) ‘ फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ ’ (१९७४ चा २) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी पोटकलम (१) खंड (ख्) खालील प्रत्येक अपराध दखली असेल.

सल्लागार मंडळे.

**८.** संविधानाच्या अनुच्छेद २२-खंड (४) उपखंड (क्) आणि खंड (७) उपखंड (ग्) यांच्या प्रयोजनार्थ,—

(क्) आवश्यक असेल तेव्हा तेव्हा केंद्र शासन आणि प्रत्येक राज्य शासन एक किंवा अधिक सल्लागार मंडळे घटित करतील, प्रत्येकामध्ये, संविधानाचा अनुच्छेद २२-खंड (४), उपखंड (क्) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अर्हता धारण करणारा अध्यक्ष व अन्य दोन व्यक्ती यांचा समावेश असेल ;

(ख्) खंड (क्) खाली घटित केलेल्या सल्लागार मंडळास, संविधानाच्या अनुच्छेद २२, खंड (४), उपखंड (क्) खाली अहवाल सादर करणे शक्य व्हावे म्हणून समुचित शासन कलम ९ मध्ये अन्यथा उपबंधित केलेले असेल त्या व्यतिरिक्त इतर बाबतीत, एखाद्या व्यक्तीला स्थानबद्धता आदेशाखाली स्थानबद्ध केल्याच्या दिनांकापासून पाच आठवड्यांच्या आत त्यासंबंधात सल्लागार मंडळाकडे निर्देश करील (ग्) खंड (ख्) खाली ज्याच्याकडे निर्देश केलेला असेल ते सल्लागार मंडळ तो निर्देश व त्याच्यासमोर ठेवलेली सामग्रीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अर्हता धारण करणारा अध्यक्ष व अन्य दोन व्यक्ती यांचा समावेश असेल ;

(ग्) खंड (ख्) खाली ज्याच्याकडे निर्देश केला असेल ते सल्लागार मंडळ तो निर्देश व त्याच्यासमोर ठेवलेली सामग्री विचारात घेतल्यानंतर व त्यास योग्य वाटेल अशी आणखी माहिती समुचित शासनाकडून किंवा समुचित शासनामार्फत त्या प्रयोजनासाठी बोलावलेल्या व्यक्तींकडून किंवा संबंधित व्यक्तीकडून मागवल्यानंतर आणि एखाद्या विशिष्ट प्रकरणी संबंधित व्यक्तींची सुनावणी करणे त्यास अत्यावश्यक वाटले किंवा तिची तशी इच्छा असली तर त्या व्यक्तिंची व्यक्तिशः सुनावणी केल्यानंतर आपला अहवाल तयार करून त्यातील एका स्वतंत्र परिच्छेदामध्ये संबंधित व्यक्तीच्या स्थानबद्धतेस पुरेसे कारण आहे किंवा नाही याबद्दलचे त्याचे मत विशेषरीत्या नमूद करील आणि संबंधित व्यक्तीच्या स्थानपद्धतेच्या दिनांकापासून अकरा आठवड्यांच्या आत तो अहवाल सादर करील ;

(घ्) सल्लागार मंडळामध्ये समाविष्ट असलेल्या सदस्यांमध्ये मतभिन्नता असेल तेव्हा अशा बहुसंख्य सदस्याचे मत हे मंडळाचे मत असल्याचे मानण्यात येईल ;

(ङ्) या अधिनियमाखाली जिच्याविरूद्ध स्थानबद्धता आदेश काढण्यात आलेला आहे ती व्यक्ती सल्लागार मंडळाकडे करण्यात आलेल्या संदर्भाशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही बाबीमध्ये कोणत्याही विधि-व्यवसायामार्फत हजर राहण्यास हक्कदार असणार नाही, आणि सल्लागार मंडळांची कार्यवाही व मंडळाच्या अहवालाच्या ज्या भागामध्ये सल्लागार मंडळाचे मत विशेषरीत्या नमूद केलेले असेल तो भाग वगळून तो अहवाल ही गोपनीय असतील ;

(च्) एखाद्या व्यक्तीच्या स्थानबद्धतेस आपल्या मते पुरेसे कारण आहे असे सल्लागार मंडळाने कळवलेले असेल त्या प्रत्येक प्रकरणी, समुचित शासनास स्थानबद्धता आदेश पक्का करता येईल आणि त्यास आवश्यक वाटेल अशा कालावधीसाठी संबंधित व्यक्तीची स्थानबद्धता चालू ठेवता येईल आणि सल्लागार मंडळाने त्याच्या मते संबंधित व्यक्तीच्या स्थानपद्धतेस पुरेसे कारण नसल्याचे कळवलेले असेल त्या प्रत्येक प्रकरणी समुचित शासन स्थानबद्धता आदेश परत घेईल व त्या व्यक्तीला ताबडतोब सोडून देण्याची व्यवस्था करील.

(एक) खंड (ख्) मध्ये " पाच आठवड्याच्या आत या मजकुराऐवजी " चार महिने आणि दोन आठवडे " हा मजकूर दाखल करण्यात येईल व " निर्देश करील " या मजकुराऐवजी " निर्देश करू शकेल " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (ग्) मध्ये " संबंधित व्यक्तीच्या सतत स्थानबद्धतेपासून " याऐवजी " त्याच्याकडे निर्देश करण्यात आल्याच्या दिनांकापासून " हा मजकूर घालण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) चे उपबंध लागू होणाऱ्या स्थानबद्धता आदेशाखाली स्थानबद्ध केलेल्या प्रत्येक व्यक्तींच्या प्रकरणाच्या संबंधात सहा सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये पोट-कलम (२) सह कलम ८ च्या खंड (क) खाली घटित केलेल्या सल्लागार मंडळाकडे निर्देश करण्यात आलेला नसेल तर किंवा असा आदेश परत घेण्यात आला नसेल तर, समुचित शासनाने त्या संबंधात नामनियुक्त केलेल्या उच्च न्यायालयाचा न्यायाधीश असलेल्या किंवा असा न्यायाधीश म्हणून राहिलेल्या किंवा असा न्यायाधिश म्हणून नियुक्त केली जाण्यास अर्हताप्राप्त व्यक्तीशी विचारविनिमय करून समुचित शासन अशा प्रकरणाचे पुनर्विलोकन करील :

परंतु, समुचित शासन हे राज्य शासन असेल त्या बाबतीत, ते शासन या संबंधात केंद्र शासनाशी देखील विचारविनिमय करील.

स्थानबद्धतेचा जास्तीत जास्त कालावधी.

**१०.** कलम ९ चे उपबंध लागू न होणाऱ्या व कलम ८ खंड (च्) खाली पक्का करण्यात आलेल्या कोणत्याही स्थानबद्धता आदेशास अनुसरून एखाद्या व्यक्तीला स्थानबद्ध करून ठेवता येईल तो जास्ती जास्त कालावधी [१][ स्थानबद्धतेच्या दिनांकापासून एक वर्षाचा कालावधी किंवा विनिर्दिष्ट कालावधी यांपैकी जो नंतर समाप्त होईल त्या कालावधीइतका ] असेल आणि कलम ९ चे उपबंध लागू होणाऱ्या व कलम ९ च्या पोट-कलम (२) सह कलम ८ च्या खंड (च्) खाली पक्का करण्यात आलेल्या कोणत्याही स्थानबद्धता स्थानबद्धता आदेशास अनुसरून एखाद्या व्यक्तीस स्थानबद्ध करून ठेवता येईल तो जास्तीत जास्त कालावधी [२][ स्थानबद्धतेच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी किंवा विनिर्दिष्ट कालावधी यांपैकी जो नंतर समाप्त होईल त्या कालावधी इतका ] असेल :

परंतु, दोहोंपैकी कोणत्याही बाबतीत कोणत्याही अगोदरच्या वेळी स्थानबद्धता आदेश मागे घेण्याच्या किंवा त्यामध्ये अपरिवर्तन करण्याच्या समुचित शासनाच्या अधिकारावर या कलमामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट परिणाम करणार नाही.

[३][ **स्पष्टीकरण.—**या कलमामध्ये व कलम १०क मध्ये " विनिर्दिष्ट कालावधी " याचा अर्थ संविधानाचा अनुच्छेद, ३५२-खंड (१) खाली ३ डिसेंबर, १९७१ रोजी काढलेली आणीबाणीची उद्घोषणा व त्या खंडाखाली २५ जून, १९७५ रोजी काढलेली आणीबाणीची उद्घोषणा या दोन्ही ज्या कालावधीमध्ये प्रवर्तनात असतील तो कालावधी असा आहे.]

स्थानबद्धतेचा कालावधी वाढविणे.

[४][ **१०क.** (१) या अधिनियमाच्या इतर कोणत्याही उपबंधामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परकीय चलन वाचवणे व चोरट्या व्यापाऱ्याच्या हालचालींना प्रतिबंध करणे (विशोधन) अधिनियम १९७६ याच्या प्रारंभापूर्वी कलम ८-खंड (च्) खाली पक्का करण्यात आलेल्या व अशा प्रारंभाच्या निकटपूर्वी अंमलात असलेल्या स्थानबद्धता आदेशाखाली स्थानबद्ध केलेल्या प्रत्येक व्यक्तीची स्थानबद्धता समुचित शासनाने उक्त खंडाखाली तिच्या स्थानबद्धतेच्या दिनांकापासून एक वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी चालू ठेवलेली नसेल तर त्या व्यक्तीची स्थानबद्धता अशा आदेशाखालील तिच्या स्थानबद्धतेच्या दिनांकापासून एक वर्षाचा कालावधी किंवा विनिर्दिष्ट कालावधी यांपैकी जो नंतर समाप्त होईल त्या कालावधीपर्यंत चालू राहील :

परंतु, असा आदेश अगोदरच्या कोणत्याही वेळी परत घेण्याच्या किंवा त्यामध्ये अपरिवर्तन करण्याच्या समुचित शासनाच्या अधिकारावर या पोट-कलमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही.

(२) [illegible] ' परकीय चलन वाचवणे व चोरट्या व्यापाराच्या हालचालींना प्रतिबंध करणे (विशोधन) अधिनियम, १९७६ ' याच्या प्रारंभापूर्वी कलम ९ च्या पोट-कलम (२) सह कलम ८-खंड (च्) खाली पक्का करण्यात आलेल्या व अशा प्रारंभाच्या निकटपूर्ती अंमलात असलेल्या स्थानबद्धता आदेशाखाली स्थानबद्ध केलेल्या प्रत्येक व्यक्तीची स्थानबद्धता, समुचित शासनाने उक्त पोट-कलम (२) सह उक्त खंड (च्) खाली तिच्या स्थानबद्धतेच्या दिनांकापासून दोन वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी चालू ठेवलेली नसेल तर त्या व्यक्तीची स्थानबद्धता अशा आदेशाखालील तिच्या स्थानबद्धतेच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधी किंवा विनिर्दिष्ट कालावधी यांपैकी जो नंतर समाप्त होईल त्या कालावधीपर्यंत चालू राहील :

परंतु, असा आदेश अगोदरच्या कोणत्याही वेळी परत घेण्याच्या किंवा त्यामध्ये अपरिवर्तन करण्याच्या समुचित शासनाच्या अधिकारावर या पोट-कलमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही.]

स्थानबद्धता आदेश परत घेणे.

**११.** (१) ' सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७ ' (१८९७ चा १०) याच्या कलम २१च्या उपबंधास बाध न येता, स्थानबद्धता आदेश,—

(क्) तो आदेश राज्य शासनाच्या अधिकाऱ्याने, त्या राज्य शासनाने किंवा केंद्र शासनाने केलेला आसला तरी देखील ;

---

१. १९७६ चा अधिनियम, २० कलम ३ द्वारे " स्थानपद्धतेच्या दिनांकापासून एक वर्ष इतका " याऐवजी घातले.

२. कित्ता कलम ३ द्वारे " स्थानपद्धतेच्या दिनांकापासून एक वर्ष इतका " याऐवजी घातले.

३. १९७६ चा अधिनियम, २० कलम ३ द्वारे घातले.

(ख) तो आदेश केंद्र शासनाच्या अधिकाऱ्याने किंवा राज्य शासनाने, केंद्र शासनाने केलेला असला तरीदेखील कोणत्याही वेळी मागे घेता येईल किंवा त्यामध्ये आपरिवर्तन करता येईल.

स्थानबद्ध व्यक्तींची तात्पुरती सुटका

**१२.** [१][ (१) केंद्र शासन कोणत्याही वेळी असा निदेश देऊ शकेल की, त्या शासनाने किंवा त्या शासनाला दुय्यम असलेल्या अधिकाऱ्याने किंवा राज्य शासनाने किंवा राज्य शासनाला दुय्यम असलेल्या अधिकाऱ्याने केलेल्या स्थानबद्धता आदेशानुसार स्थानबद्ध केलेल्या कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही विनिर्दिष्ट कालावधीसाठी एकतर विनाशर्त किंवा ती व्यक्ती मान्य करील अशा, त्या निदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींवर सोडून देता येईल आणि ते कोणत्याही वेळी किती सुटका रद्द करू शकेल.

(१क) राज्य शासन कोणत्याही वेळी असा निदेश देऊ शकेल की, त्या शासनाने किंवा त्या शासनाला दुय्यम असलेल्या अधिकाऱ्याने केलेल्या स्थानबद्धता आदेशानुसार स्थानबद्ध केलेल्या कोणत्याही व्यक्तीला विनिर्दिष्ट कालावधीसाठी एकतर विनाशर्त किंवा ती व्यक्ती मान्य करील अशा, त्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींवर सोडून देता येईल आणि ते कोणत्याही वेळी तिची सुटका रद्द करू शकेल.]

(२) [२][ पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (१क) खाली कोणत्याही व्यक्तीच्या सुटकेचा निदेश देताना सुटकेचा निदेश देणारे शासन] तिला निदेशामध्ये विनिर्दिष्ट शर्तींच्या यथोचित पालनाबद्दल जामीनदारांसह बंधपत्र करून देण्यास फर्मावू शकेल.

(३) [३][ पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (१क) खाली] सोडून देण्यात आलेली कोणतीही व्यक्ती स्वतःस प्रकरणपरत्वे तिच्या सुटकेचा निदेश देणाऱ्या किंवा तिची सुटका रद्द करणाऱ्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या असा वेळी व ठिकाणी व अशा प्राधिकाऱ्याच्या स्वाधीन करील.

(४) एखादी व्यक्ती पुरेशा कारणावाचून, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने स्वतःस स्वाधीन करण्यात कसूर करील तर ती दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(५) [४][ पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (१क) खाली] सोडून देण्यात आलेली कोणतीही व्यक्ती उक्त पोट-कलमाखाली किंवा तिने करून दिलेल्या बंधपत्रात तिच्यावर घालण्यात आलेल्यांपैकी कोणत्याही शर्ती पूर्ण करण्यात कसूर करील तर बंधपत्र समपहत झाल्याचे घोषित करण्यात येईल आणि त्याद्वारे आबद्ध झालेली कोणतीही व्यक्ती त्याबद्दलचा दंड भरण्यास पात्र असेल.

[१][(६) इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी आणि या कलमामध्ये अन्यथा उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त, या अधिनियमाखाली केलेला स्थानबद्धता आदेश जिच्या विरूद्ध अंमलात असेल त्या कोणत्याही व्यक्ती जामिनावर, जामीन-बंधपत्रावर किंवा अन्यथा सोडून देण्यात येणार नाही.]

आणीबाणीस तोंड देण्यासाठी विशेष उपबंध.

[५][ **१२क.** (१) या अधिनियमामध्ये किंवा नैसर्गिक न्यायासंबंधीच्या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, संविधानाचा अनुच्छेद ३५२ खंड (१) खाली ३ डिसेंबर १९७१ रोजी काढलेल्या आणीबाणीच्या उद्घोषणेचा किंवा त्या खंडाखाली २५ जून १९७५ रोजी काढलेल्या आणीबाणीच्या उद्घोषणेचा प्रवर्तन कालावधी किंवा २५ जून, १९७५ पासून [६][ चोवीस महिन्यांचा] कालावधी यांपैकी जो सर्वात कमी असेल त्या कालावधीमध्ये या कलमाचे उपबंध परिणामक असतील.

(२) ' परकीय चलन वाचवणे व चोरट्या व्यापाराच्या हालचालींना प्रतिबंध करणे (विशोधन) अधिनियम, १९७५ ' याच्या प्रारंभानंतर कोणत्याही व्यक्तीविरूद्ध या अधिनियमाखाली स्थानबद्धता आदेश करताना प्रकरणपरत्वे

१. १९७६ चा अधिनियम २० कलम ४ द्वारे मूळ पोट-कलम (१) ऐवजी घातले.

२. १९७९ चा अधिनियम २० कलम ४ द्वारे " पोट-कलम (१) खाली कोणत्याही व्यक्तीच्या सुटकेचा निदेश देताना समुचित शासन " याऐवजी घातले.

३. १९७९ चा अधिनियम २० कलम ४ द्वारे " पोट-कलम (१) खाली " याऐवजी घातले.

४. १९७५ चा अधिनियम ३५ कलम ३ द्वारे घातले.

५. १९७५ चा अधिनियम ३५ कलम ४ द्वारे घातले.

६. १९७६ चा अधिनियम ९० कलम २ द्वारे " बारा महिन्यांचा " याऐवजी घातले.

केंद्र शासन किंवा राज्य शासन किंवा स्थानबद्धता आदेश करणारा अधिकारी पोट-कलम (१) मध्ये निर्देशिलेल्या उद्‌घोषणा जिच्या संबंधात काढण्यात आलेल्या आहेत त्या आणीबाणीचा (या कलमात यापुढे ' आणीबाणी ' म्हणून निर्देशिलेल्या,) परिणामकारक रीतीने परामर्श घेण्यासाठी या अधिनियमाखालील अशा व्यक्तींची स्थानबद्धता आवश्यक आहे किंवा कसे ते विचारात घेईल आणि जर अशा विचारान्ती, आणीबाणीच्या परिणामकारक रीतीने परामर्श घेण्यासाठी अशा व्यक्तीला स्थानबद्ध करणे आवश्यक आहे याबद्दल प्रकरणपरत्वे केंद्र शासनाची किंवा राज्य शासनाची किंवा अधिकाऱ्याची खात्री पटली तर त्या शासनाला किंवा अधिकाऱ्याला तशा आशयाची उद्‌घोषणा करता येईल व उद्‌घोषणेची प्रत संबंधित व्यक्तीकडे पाठविता येईल :

परंतु अधिकारी अशी उद्‌घोषणा करील त्या बाबतीत, उद्‌घोषणा केल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत समुचित शासन तिचे परीक्षण करील व अशा पुनरीक्षणानंतर त्या शासनाने अशी उद्‌घोषणा पंधरा दिवसांच्या उक्त कालावधीच्या आत कायम केली नाही तर ती परिणामकारक असण्याचे बंद होईल.

(३) पोट-कलम (२) खाली जिच्या संबंधात उद्‌घोषणा करण्यात आलेली असेल त्या कोणत्याही व्यक्तीची स्थानबद्धता आणीबाणीचा परिणामकारक परामर्श घेण्यासाठी आवश्यक असणे चालू आहे किंवा कसे या प्रश्नाचा फेरविचार समुचित शासन अशा उद्‌घोषणेच्या दिनांकापासून चार महिन्याच्या आत आणि त्यानंतर चार महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा कालांतरा गणीक करील आणि अशा फेरविचारांती, आणीबाणीचा परिणामकारक रीतीने परामर्श घेण्यासाठी त्या व्यक्तीच्या स्थानबद्धतेची आवश्यकता उरलेली नाही असे समुचित शासनाला दिसून आल्यास त्या शासनाला उद्‌घोषणा मागे घेता येईल.

(४) पोट-कलम (२) किंवा (३) खाली कोणताही विचार, परीक्षण किंवा फेरविचार करताना, समुचित शासनाला किंवा अधिकाऱ्याला अन्यथा करणे हे सार्वजनिक हिताच्या विरूद्ध आहे असे वाटले तर अशा शासनाला किंवा अधिकाऱ्याला संबंधित व्यक्तिकडे तथ्ये प्रकट न करता किंवा तिला अभिवेदन करण्याची संधी न देता, त्याच्या ताब्यात असलेल्या माहितीच्या किंवा सामग्रीच्या आधारे कृती करता येईल.

(५) पोट-कलम (२) चे उपबंध लागू होणाऱ्या स्थानबद्धता आदेशाखाली स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीकडे, ते पोट-कलम अंमलात असताना अशा व्यक्तीच्या संबंधात केलेल्या उद्‌घोषणेच्या कालावधीमध्ये, ज्यासाठी आदेश करण्यात आलेला असेल ती कारणे प्रकट करणे आवश्यक असणार नाही आणि तद्‌नुसार कलम ३ पोट-कलम (३) च्या प्रयोजनार्थ असा कालावधी हिशेबात घेतला जाणार नाही.

(६) पोट-कलम (२) चे उपबंध लागू होणाऱ्या स्थानबद्धता आदेशाखाली स्थानबद्ध केलेल्या, त्याखाली जिच्या संबंधात उद्‌घोषणा करण्यात आलेली आहे अशी व्यक्ती असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत, अशी उद्‌घोषणा ज्या कालावधीमध्ये अंमलात असेल तो कालावधी,—

(एक) कलम ८ खंड (ख्) व (ग्) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधींची ;

(दोन) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या " एक वर्षाच्या " व " पाच आठवड्यांच्या " कालावधींची, पोट-कलम (२) (एक) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या " एक वर्षाच्या " कालावधीची व कलम ९ पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या " सहा महिन्यांच्या " कालावधीची, संगणना करण्याच्या प्रयोजनार्थ हिशेबात घेतला जाणार नाही.]

सद्‌भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीचे संरक्षण.

**१३.** या अधिनियमाच्या अनुरोधाने सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल केंद्र शासनाविरूद्ध किंवा राज्य शासनाविरूद्ध कोणताही वाद किंवा अन्य वैध कार्यवाही दाखल करता येणार नाही आणि कोणत्याही व्यक्तीविरूद्ध कोणताही वाद, खटला किंवा अन्य वैध कार्यवाही दाखल करता येणार नाही.

निरसन

**१४.** ' अंतर्गत सुरक्षा राखणे (विशोधन) अध्यादेश, १९७४ ' (१९७४ चा ११) हा या अधिनियमाच्या प्रारंभानंतर निरसित होईल व तद्‌नुसार ' अंतर्गत सुरक्षा राखणे अधिनियम, १९७१ ' (१९७१ चा २६) यामध्ये उक्त अध्यादेशाद्वारे केलेली विशोधने अशा प्रारंभानंतर परिणामकारक असण्याचे बंद होतील.

# परकीय चलनाचे रक्षण तस्करी व्यवहारास प्रतिबंध करणे अधिनियम, १९७४

(वरील अधिनियमात झालेल्या विशोधनाचा मराठी अनुवाद)

कोणत्या बाबतीत आणि कोणत्या परिस्थितीत सल्लागार मंडळाचे मत घेतल्याशिवाय एखाद्या व्यक्तीस तीन महिन्यांपेक्षा अधिक मुदतीकरिता स्थानबद्ध करता येईल.

**९.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरीही कोणत्याही व्यक्तीस (परकीय व्यक्ती धरून) जिच्या संबंधात दिनांक ३१ जुलाई १९८७ च्या पूर्वी कोणत्याही वेळी या अधिनियमान्वये स्थानबद्धतेवर आदेश केलेला असेल, संविधानाच्या अनुच्छेद २२ चा खंड (४) चा उपखंड (क्) च्या प्रावधानांनुसार स्थानबद्धतेच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या मुदतीपेक्षा जास्त व सहा महिन्याच्या मुदतीपेक्षा कमी नाही इतक्या मुदतीकरिता सल्लागार मंडळाचे मत घेतल्याशिवाय स्थानबद्ध करता येईल, जेथे एखाद्या व्यक्तीच्या विरूद्ध स्थानबद्धतेचा आदेश, तिला मालाची तस्करी करण्यापासून परावृत्त करण्याच्या किंवा तिने मालाची तस्करी करण्यास उपशमन करू नये किंवा तिने तस्करीच्या मालाच्या परिवहनात किंवा लपविण्यात किंवा ठेवण्यात गुंतु नये या उद्देशाने केला असेल आणि केंद्र सरकारचे किंवा सरकारच्या द्वारे या कलमाच्या प्रयोजनार्थ विशेष शक्ती प्राप्त असलेल्या व शासनाच्या अतिरिक्त सचिवाच्या पदापेक्षा कमी नसलेल्या कोणत्याही केंद्र सरकारच्या अधिकाऱ्याचे समाधान झाल्यास की अशी व्यक्ती,—

(क्) तस्करीकरिता फारच अनुकूल असलेल्या जागेमध्ये, जागेच्या बाहेर, किंवा जागेमधून मालाची तस्करी करते किंवा तसे करण्याची तिच्या द्वारे संभावना आहे ;

(ख्) तस्करीकरिता अत्यंत अनुकूल असलेल्या जागेमध्ये, जागेबाहेर किंवा जागेतून मालाची तस्करी करण्याकरिता उपशमन करते किंवा तसे करण्याची तिच्याद्वारे संभावना आहे ;

(ग्) तस्करीकरीता अत्यंत अनुकुल असलेल्या जागेमध्ये तस्करीचा माल परिवहन करण्यात, लपविण्यात किंवा ठेवण्यात गुंतवते किंवा गुंतविण्याची तिच्या द्वारे संभावना आहे ;

आणि अशा व्यक्तीच्या स्थानबद्धतेपासून पाच आठवड्यांच्या आत तशा आशयाची घोषणा करते.

**स्पष्टीकरण १**— या पोट-कलमात तस्करीसाठी अत्यंत अनुकूल क्षेत्र याचा अर्थ,—

(एक) गुजरात, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र आणि तामिळनाडू राज्याच्या आणि संघराज्य क्षेत्र गोवा, दमण आणि दीव आणि पाँडेचरी यांना सलग असलेली भारतीय सीमा शुल्क जलधी ;

(दोन) गुजरात, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र आणि तामिळनाडू राज्याच्या आणि संघराज्य क्षेत्र गोवा, दमण आणि दीव आणि पाँडेचरी यांच्या राज्यक्षेत्रात येणाऱ्या भारताच्या समुद्र किनाऱ्यापासून पन्नास किलो मीटरच्या रूंदीचे अंतर्देशीय क्षेत्र ;

(तीन) गुजरात, जम्मू आणि काश्मीर, पंजाब आणि राजस्थान राज्यांच्या मधील भारत-पाकिस्तान यांच्या सीमेपासून पन्नास किलो मीटर रूंदीचे अंतर्देशीय क्षेत्र ;

(चार) दिल्लीचे सीमाशुल्क विमानतळ ; आणि

(पाच) अशी आणखी किंवा इतर भारतीय जलधी क्षेत्रे किंवा भारताच्या सीमेपासून किंवा कोणत्याही इतर समुद्र किनाऱ्यापासून एक हजार किलो मीटर रूंदी पेक्षा अधिक नसलेली अंतर्देशीय क्षेत्रे केंद्रीय सरकारास **शासकीय राजपत्रात** अधिसूचनेद्वारे त्याबाबतीत विनिर्दिष्ट करता येतील अशा तस्करी करण्यासाठी अनुकूल वाटतील अशी जलधी क्षेत्रे, किंवा सीमाशुल्क स्टेशन.

**स्पष्टीकरण २**— स्पष्टीकरण १ च्या प्रयोजनार्थ सीमाशुल्क विमानतळ किंवा सीमाशुल्क स्टेशन यांचा अर्थ सीमाशुल्क अधिनियम, १९६२ च्या कलम २ च्या अनुक्रमे पोट-कलम १० व १३ मध्ये दिल्याप्रमाणेच असेल.

(२) स्थानबद्धतेच्या आदेशान्वये जर एखाद्या व्यक्तीस स्थानबद्ध करण्यात आले असेल व त्यास पोट-कलम १ लागू होत असेल तर पुढील फेरबदलांच्या अधीनतेने कलम ८ परिणामकारक होईल असे,—

(एक) खंड (ख) मध्ये शब्द " पाच आठवड्याच्या आत " च्या ठिकाणी " चार महिने आणि दोन आठवड्याच्या आत " असे शब्द घालावेत.

(दोन) (१) खंड (ग) मध्ये शब्द " संबंधित व्यक्तीची स्थानबद्धता " या ऐवजी " संबंधित व्यक्तीच्या सतत स्थानबद्धतेपासून " असे करावे.

(२) शब्द " सात आठवडे " च्या ऐवजी " पाच महिने आणि दोन आठवडे " हे शब्द घालावेत.

(३) खंड (च) मध्ये शब्द " स्थानबद्धते करता " या ऐवजी दोन्ही ठिकाणी " सतत स्थान बद्धतेपासून " हे शब्द घालावेत.

(३) (१) परकीय चलनाचे रक्षण व तस्करी व्यवहारास प्रतिबंध करणे (विशोधन) अध्यादेश १९८४ याद्वारे निरसित होईल.

(२) अशा प्रकारे जरी निरसन असले तरीही मुख्य अधिनियमांच्या अन्वये केलेल्या कोणत्याही कृतीसाठी किंवा कारवाईसाठी, जसे की या अध्यादेशाद्वारे विशोधित केले आहे, या अधिनियमाच्या विशोधनाप्रमाणे केलेली कृती किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल.